जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2025
पुढारी

# विद्यापीठांनी संशोधनाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे

## उच्चशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील; यशवंतराव चव्हाण स्कूलच्या इमारतीचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठांनी आता संशोधनाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याची शासनाची भूमिका आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या (वायसीएसआरडी) नूतन इमारतीच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, परकीय आक्रमकांनी इथली संस्कृती, कला आणि परंपरा पुसून टाकण्याचे काम केले. युरोपातील ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या परंपरेविषयी सांगितले जाते. तथापि, ऑक्सफर्डपूर्वी नालंदा विद्यापीठ होते. ऑक्सफर्डच्या काळातच तक्षशीला विद्यापीठ होते. या समृद्ध वारशाप्रती सजग झाले पाहिजे.



**शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या इमारतीचे कोनशिला अनावरणाने उद्घाटन करताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे आदी (छाया : पप्पू अत्तार)**

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. संचालक डॉ. नितीन माळी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. डी.आर. मोरे, डॉ. व्ही.एम. पाटील उपस्थित होते.

दरम्यान, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाषणामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कारकीर्दीचा गौरव केला. डॉ. शिर्के यांच्या रुपाने चांगले कुलगुरू ६ ऑक्टोबरला पदउतार होत आहेत. त्यामुळे मंत्री म्हणून माझ्यासमोर व्हॉट नेक्स्ट? असा प्रश्न उभा आहे. त्यांनी विद्यापीठाचे अनेक प्रश्न मार्गी लावले. त्यामुळे शासनाकडून निधीसह सर्व सहकार्य प्राप्त करवून घेण्यात त्यांना यश आले असल्याचे त्यांनी सांगितले.

30 SEP 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक आघाडीच्या संशोधकांत विद्यापीठाचे २० संशोधक

## अमेरिकेच्या स्टॅनफर्ड विद्यापीठाची क्रमवारी जाहीर :राज्यभरातील विद्यार्थ्यांचाही समावेश

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाच्या २० संशोधकांनी स्थान प्राप्त केले आहे. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने संशोधकांची सन २०२५ सालची यादी नुकतीच जाहीर केली आहे. शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय महत्त्व जगाच्या नकाशावर अधोरेखित झाले आहे.

संशोधकांच्या सर्वसमावेशक कामगिरीच्या आधारे सदर संशोधकांची यादी तयार करण्यात आली आहे. यामध्ये प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह डॉ. ए. व्ही. राव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ज्योती जाधव व डॉ. सी. एच. भोसले या पाच संशोधकांचा समावेश आहे. गेली सहा वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय महत्त्व जगाच्या नकाशावर अधोरेखित करत आहेत. ही अभिमानाची बाब आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

गत वर्षातील संशोधकीय कामगिरीच्या आधारे स्टॅनफोर्ड विद्यापीठाने ही निवड केली आहे. या २० संशोधकांव्यतिरिक्त राज्यासह जगभरात अन्य शिक्षण संस्था, विद्यापीठांत कार्यरत असणारे शिवाजी विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थीही या दोन टक्के संशोधकांत समाविष्ट आहेत.

**असे आहेत निवड झोलेले संशोधक**

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रमोद पाटील (पदार्थविज्ञान) यांच्यासह निवृत्त प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), निवृत्त प्रा. सी. एच. भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थविज्ञान), निवृत्त डॉ. संजय गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), डॉ. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डोंगळे (नॅनोसायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), डॉ. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. संजय लट्टे (पदार्थविज्ञान), डॉ. के. के. पवार (जैवतंत्रज्ञान), सचिन ओतारी (जैवतंत्रज्ञान), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे.

### अशी आहे स्टॅनफोर्ड विद्यापीठाची रँकिंग प्रक्रिया

संशोधनाची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने शोधनिबंधाला मिळणारी सायटेशन्स, एच निर्देशांक, सहलेखकत्व, संशोधन लेखकाची भूमिकांचा विचार करून सर्वसमावेशक अशी संयुक्त सूचक (सी स्कोर) निर्देशांक काढून ही जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांची क्रमवारी प्रसिद्ध केली आहे. ही प्रणाली 'आयसीएसआर' लॅबद्वारे 'एल्सव्हियर'ने प्रदान केलेल्या स्कोपस डेटाचा वापर करते. दरवर्षी ही प्रमाणित क्रमवारी जाहीर केली जाते. २२ विज्ञान विषय आणि १७४ उपविषयांमधील संशोधनाची यात दखल घेतली गेली.

### नवसंशोधकांनी सिद्ध व्हावे

संशोधकांना जागतिक यादीमध्ये स्थान मिळण्यामागे त्यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ अव्याहतपणे केलेले संशोधन कारणीभूत आहे. या सर्वांनी विद्यापीठात एक संशोधन शिस्त निर्माण केली. विद्यापीठात उत्तम संशोधन परंपरा निर्माण झाली आहे. हा वारसा पुढे घेऊन जाण्यास नवसंशोधकांनी सिद्ध व्हायला हवे. गेल्या पाच वर्षात या यादीत शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी स्थान टिकवून ठेवले आहे.

**– डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 SEP 2025

तरुण भारत



गडहिंग्लज : विभागीय महिला कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकावलेला भोगावती महाविद्यालयाच्या मुलींचा संघ, शेजारी मान्यवर.

# विभागीय कबड्डी स्पर्धेत भोगावती महाविद्यालय विजेते

प्रतिनिधी
गडहिंग्लज

येथील डॉ. घाळी कॉलेज आयोजित शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विभागीय महिला कबड्डी स्पर्धा शिवाजी विद्यापीठ येथे पार पडल्या. यामध्ये ९ संघ सहभागी झाले होते. यामध्ये भोगावती महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने गोल्डन रेड करत विजेतेपद पटकावले तर आण्णासाहेब डांगे महाविद्यालयाला हातकणंगले. उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

अन्य निकालात व्ही. पी. माने कॉलेज, कारवे तृतीय तर दुधसाखर महाविद्यालय बिद्री यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला. स्पर्धेचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्या हस्ते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक गोरख माळी, शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी गोरख माळी यांनी सर्व खेळाडूंना खेळाचे मानवी आयुष्यातील मानसिक आरोग्याबद्दलचे महत्व सांगितले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. दत्ता पाटील अध्यक्षस्थानी होते. आयोजक म्हणून शारीरिक शिक्षण संचालक विकास अतिग्रे यांनी काम पाहिले.

3 0 SEP 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या वक्तृत्व स्पर्धेत प्राची शिंदे प्रथम


**सरवडे :** शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव बापूजी साळुंखे महाविद्यालय मिरज येथे झाला. त्यामध्ये दूधसाखर महाविद्यालय बिद्रीची विद्यार्थिनी प्राची शिंदे हिने हिंदी वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तिने सलग दुसऱ्या वर्षी मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये हिंदी वक्तृत्व मध्ये प्रथम क्रमांक पटकावला.

तिला अध्यक्ष के. पी. पाटील, उपाध्यक्ष मनोज फराक्टे, सचिव सर्जेराव किल्लेदार, सर्व संचालक, प्राचार्य डॉ. संजय पाटील प्रा. डॉ. आर. एस. पाटील यांचे प्रोत्साहन तर प्रा. डॉ. डी. एन. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 SEP 2025
लोकसत्ता

# बाळासाहेब देसाई यांच्यामुळेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरात

## शंभुराज देसाई यांचा दावा



मंत्री शंभुराज देसाई, प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते ग्रंथ प्रकाशन करण्यात आले.

कोल्हापूर : लोकनेते बाळासाहेब देसाई हे साताऱ्याचे असतानाही त्यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरातच झाले पाहिजे असा आग्रह लावून धरला होता. त्यांच्या तळमळीतूनच हे विद्यापीठ आकाराला आले, असा दावा पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांनी शुक्रवारी येथे केला.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे 'विचारधनः लोकनेते बाळासाहेब देसाई यांची विधिमंडळातील भाषणे भाग-१' या विजय चोरमारे संकलित व संपादित ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाची संकल्पना पुढे आली तेव्हा ते कोल्हापूर येथे की सातारा येथे असावे याबाबत दुविधा होती, असे स्पष्ट करतानाच मंत्री देसाई यांनी हे विद्यापीठ कसे आकाराला आले याचा इतिहास नमूद केला. ते म्हणाले, 'मंत्रिमंडळासमोर या विषयीचा प्रस्ताव येणार असल्याचे समजताच प्रकृतीअस्वास्थ्य असतानाही बाळासाहेब देसाई त्या बैठकीसाठी पोहोचले. आणि स्वतः साताऱ्याचे असतानाही कोल्हापूर येथेच विद्यापीठ होण्यासाठी आग्रह लावून धरला. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापूर या तीन बाबी त्यांच्या श्रद्धास्थानी असल्याने कोल्हापूरकडे त्यांचा कल राहिला.

### साताऱ्याशी नाळ

माझे खटाव येथील चुलते बाळासाहेब देसाई यांचे कार्यकर्ते होते. ते बाळासाहेब देसाई यांच्या आठवणी आम्हाला सांगायचे. आज मी त्यांच्या नातवासमवेत काम करतो आहे, याचा मला मनस्वी आनंद आहे, अशा शब्दांत पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आपली साताऱ्याशी असलेले नाते उलगडून सांगितले.